# विदयार्थी विकास विभाग

## शैक्षणिक वर्ष 2021-2022 चा वार्षिक अहवाल

**कबचौ,उ.म.विदयापीठ** अंतर्गत **विदयार्थी विकास विभागामार्फत** राबविण्यात येणा-या व **स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविदयालयाने** सहभाग घेतलेल्या विविध उपक्रमांचा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद होत आहे.

शैक्षणिक वर्ष **2021-2022** मधील विदयार्थी विकास विभागाची प्रथम सभा मा.प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि.05/10/2021 रोजी घेण्यात आली. सभेत मागील शैक्षणिक वर्षाचा कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच मागिल वर्षी विभागा मार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळांचा यशस्वीतेबाबत समाधान व्यक्त् करुन नुतन शैक्षणिक वर्ष असेच उपक्रम राबवावेत असे मत व्यक्त् करण्यात आले. तसेच विदयार्थी हित लक्षात घेता विदयापीठा मार्फत गरीब होतकरु विदयार्थ्याना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी पात्र विदयार्थ्यांचे अर्ज मागविण्याचे परवानगी देण्यात आली. त्याच प्रमाणे विदयापीठ स्तरीय विविध कार्यशाळा, अविष्कार,युवारंग इ.सारख्या उपक्रमात जास्तीत जास्त् विदयार्थ्यांना सहभागी करुन त्यांचा कला गुणांना वाव मिळावा असे ठरविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष **2021-2022** मध्ये विदयार्थी विकास विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे.

1- **कमवा व शिका योजना** : महाविदयालयात गरीब व होतकरु विदयार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या कमवा व शिका योजने साठी विदयापीठ परीपत्रकानुसार आठ विदयार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यास मा.प्राचार्यांच्या शिफारशीने प्रस्ताव तयार करुन विदयापीठाकडे पाठविण्यात आला. या उपक्रमात सहभागी विदयार्थ्यांनी माहे फेब्रु २०२२ ते मार्च २०२२ या offline period मध्ये महाविदयालय परीसरात बाबकाम ,रोपलागवड, झाडांना पाणी देणे ,परीसर स्वच्छता ,ग्रथालयीन कामे ,विज्ञान विभागातील प्रयोगशाळा स्वच्छता,कार्यालयीन उपयुक्त् कामे इ.कामकाज केले.त्यांचा कामाचा मेहनताना म्हणुन **35160**/- रुपये एकूण 08 निवड झालेल्या विध्यार्थांच्या बँक खाती सदर रक्कम वर्ग करून कार्यपूर्ती अहवाल विदयार्थी विकास विभागास सादर करण्यात आला. व त्याच प्रमाणे सेन्ट्रल ऑडीट सुद्धा पूर्ण करून विदयार्थी विकास विभागास सादर करण्यात आला.

2- **आर्थिक दुर्बल घटक योजना** : विदयापीठामार्फत अपंग,अनाथ,गरीब विदयार्थ्यांसाठी देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी महाविदयालयातील 15 विदयार्थ्यांची निवड करण्यात येवुन तसा प्रस्ताव विदयापीठ विदयार्थी कल्याण विभागात पाठविण्यात आला. या योजनेखाली **15** विदयार्थ्यांना विदयापीठाकडुन **77,000**/- रुपये मंजुर करण्यात आले व त्याप्रमाणे विध्यार्थांच्या बँक खाती सदर रक्कम वर्ग करून कार्यपूर्ती अहवाल विदयार्थी विकास विभागास सादर करण्यात आला.

3- **आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळा** -शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला विदयापीठ परीपत्रकानुसार महाविदयालयाने 02 कार्यशाळा आयोजनासाठीचे प्रस्ताव विदयापीठाकडे सादर केले. त्यात युवतीसभे अंतर्गत व्यक्तीमत्व् विकास कार्यशाळा व श्रमसंस्कार व व्यक्ती मत्व विकास कार्यशाळा यांचा आयोजनास विदयापीठाने परवानगी दिली.

✓ **युवतीसभा-** **सोमवार दि.12 मार्च 2022 रोजी विदयार्थी विकास विभाग, कबचौउमवि जळगांव पुरस्कृत व स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविदयालय म्हसदी आयोजित युवती सभे अंतर्गत एकदिवशीय विदयार्थीनी व्यक्तीमत्व् विकास कार्यशाळा आमच्या महाविदयालयात आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत परिसरातील सात महाविदयालयाच्या एकुण 86 विदयार्थीनीं सहभागी झाल्या त्यात सि.गो.पाटील महाविदयालय साक्री, विमलबाई महाविदयालय,साक्री, उत्तमराव पाटील महाविदयालय दहिवेल,एनएनसी महाविदयालय ,कुसुंबा, आदर्श महाविदयालय निजामपुर, कर्मवीर अ.मा.पाटील महाविदयालय,पिंपळनेर व म्हसदी महाविदयालयाच्या विदयार्थीनींचा सहभाग होता.**

✓ **तीनदिवसीय श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा :**

दि.०३/०५/२०२२ ते ०५/०३/२०२२ दरम्यान विद्यार्थी विकास विभाग, कबचौउमविदयापीठ जळगांव पुरस्कृत व स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी आयोजित तीनदिवसीय श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आमच्या महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत धुळे, जळगाव व नंदुरबार या तीन जिल्हातील वेगवेगळया महाविद्यालयातुन एकुण 146 विदयार्थ्यांनी उत्साहपुर्वक सहभाग नोंदवला.

या तीनदिवसीय श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे उद्घाटन दि.03/03/2022 रोजी सकाळी ठिक 10.00 वाजता मा.प्रा.डॉ. सुनील कुलकर्णी (संचालक, विद्यार्थी विकास विभाग, क.ब.चौ. उ.म.वि., जळगाव) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन आ. ध. मा. शि. प्र. संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.दादासो. संजयकुमार आर देवरे हे उपस्थित होते. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन मा. दादासो. सुभाष गजमल देवरे (अध्यक्ष-धनदाई तरूण ऐक्यमंडळ, म्हसदी) तसेच प्रमुख उपस्थिती म्हणुन मा. आबासो. राजाराम माणिक देवरे, (उपाध्यक्ष, आ. ध. मा. शि. प्र. संस्था, धुळे), मा. डॉ. संजीवनी संजयकुमार देवरे (सचिव, आ. ध. मा. शि. प्र. संस्था, धुळे), मा.डॉ.ताईसो.सुजाता सुनिल देवरे (खजिनदार, आ. ध. मा. शि. प्र. संस्था, धुळे) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी बी. पाटील होते.

या तीनदिवसीय श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन प्रत्येक दिवशी एकुण 4 सत्रात करण्यात आले होते. प्रथम दिवशी दि.03/03/2022 सकाळी प्रथम सत्रात नाव नोंदणी व ठिक 10 वाजता उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर द्वितीय सत्रात 11.00 ते 1.30 दरम्यान विविध महाविद्यालयातुन श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत सहभागी झालेल्या सुमारे 146 विदयार्थ्याची ओळख व गटविभागनी करण्यात आली. त्यानंतर 1.00 ते 2.00 दरम्यान सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला. तृतीय सत्रात 2.00 ते 3.00 दरम्यान प्रा. दत्ता ढाले यांनी “व्यक्तिमत्व

विकासासाठी उत्तम आरोग्य” या विषयावर सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून मंत्रमुग्ध केले. त्यानंतर चतुर्थ सत्रात 3.30 ते 5.00 दरम्यान मा. प्रा. डॉ. विलास चव्हाण (माजी संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, कबचौउमवि, जळगाव) यांनी श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास या विषयावर विविध प्रात्यक्षिक सादर करून विविध महाविद्यालायातुन आलेल्या विदयार्थ्यां मध्ये आत्मविश्वास व व्यक्तिमत्व विकास कसा निर्माण करावा या बद्दल मार्गदर्शन केले. या सत्रानंतर विदयार्थ्यांना विश्राम व भोजन अवकाश देण्यात आला. रात्री 8.00 ते 9.30 दरम्यान विद्यार्थांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा याशाठी विविध विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थांसाठी खुले व्यासपीठ निर्माण करण्यात आले.

श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेच्या दुस-या दिवशी प्रभातकाळी ठिक 7.00 ते 9.00 दरम्यान योगासन व प्राणायम या विषयावर प्रा.डॉ. जे.पी.तोरवणे क्रिडासंचालक यांनी सत्र बाह्य मोलाचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर अल्पोहार पश्यात प्रथम सत्रात 10.00 ते 11.30 दरम्यान मा.बाबासो.इंजि. कुणाल देवरे (संचालक आ. ध. मा. शि. प्र. संस्था, धुळे ) यांनी “व्यक्तिमत्व विकास ” या विषयावर विदयार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. द्वितीय सत्रात विद्यार्थांमध्ये श्रमसंस्कार रुजावे या हेतूने परिसरातील स्वच्छता व वनस्पती संगोपन करून घेण्यात आले. त्यानंतर दुपारी 1.00 ते 2.00 दरम्यान सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. तृतीय सत्रात 2.00 ते 3.30 दरम्यान डॉ. माधव कदम जि.टी.पी. महाविद्यालय नंदुरबार यांनी श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास या विषयावर विद्यार्थ्यांना अतिशय सुंदर दाखले देत व्यक्तिमत्व विकास कसा साधावा हे पटवून दिले. त्यानंतर चतुर्थ सत्रात विदयार्थ्यांना परिसरातील शिवारात शिवार फेरी करीत परिसरातील नंदनवनाचे दर्शन घडवुन आणण्यात आले. या सत्रानंतर विद्यार्थ्यांना विश्राम व भोजन अवकाश देण्यात आला व रात्री 8.00 ते 9.30 दरम्यान विविध विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेच्या तिस-या दिवशी प्रभातकाळी ठिक 7.00 ते 9.00 दरम्यान ध्वजप्रशिक्षण या अलौकिक विषयावर क्रिडासंचालक प्रा.डॉ. जे.पी.तोरवणे यांनी सत्र बाह्य मोलाचे प्रात्यक्षिक करुन दाखवित राष्ट्रीय ध्वजाची सहिता पटवून दिली. त्यानंतर अल्पोहार पश्यात प्रथम सत्रात 10.00 ते 11.30 दरम्यान सर्व विद्यार्थांमध्ये श्रमसंस्कार रुजावे या हेतूने परिसरातील स्वच्छता व वनस्पती संगोपन करून घेण्यात आले. द्वितीय सत्रात 11.30 ते 1.00 दरम्यान डॉ. हेमंतकुमार पाटील व्यक्तिमत्व विकास या विषयावर अनमोल मार्गदर्शन केले. त्यानंतर दुपारी 1.00 ते 2.00 सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. तृतीय सत्रात 2.00 ते 3.30 दरम्यान प्रा.डॉ.एच.एम.शेख, समन्वयक विद्यार्थी विकास विभाग, धुळे जिल्हा यांनी श्रमसंस्कार अंतर्गत व्यक्तिमत्व जडणघडण या विषयावर विद्यार्थांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर चतुर्थ सत्रात श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी समारोपकर्ते डॉ.एच.एम.शेख, समन्वयक विद्यार्थी विकास विभाग, धुळे जिल्हा तसेच समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ.शिवाजी बी.पाटील व प्रमुख पाहुणे म्हणुन मा.दादासो.महेंद्र दौलत देवरे, सचिव धनदाई तरुण ऐक्य मंडळ म्हसदी आदींच्या उपस्थित समारोप संपन्न झाला. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.विशाल

नारायण शिंदे यांनी सर्वांचे आभार मानुन राष्ट्रगीताने कार्यशाळेची सांगता करण्यात आली व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच गट्निहाय प्रोहत्सान बक्षिस वितरण करून निरोप देण्यात आला.

4- **विविध उपक्रमात सहभाग**- विदयापीठ पुरस्कृत व विदयार्थी कल्याण विभाग आयोजित विविध महाविदयालयातील कार्यशाळामध्ये महाविदयालयातील विदयार्थ्यांचा सहभाग मोठया प्रमाणात होता. या कार्यशाळांसाठी महाविदयालयाने **रु.15070/-** प्रवास खर्च केला. त्यात युवारंग,अविष्कार ,युवतीसभा ,साहस कार्यशाळा,जागतिक तापमानवाढ कार्यशाळा ,मैत्री कार्यशाळा,पोवाडा गायनकार्यशाळा ,आपतकालीन कार्यशाळा इ. कार्यशाळांमध्ये विदयार्थी सहभागी झाले त्याचा आलेख पुढील प्रमाणे आहे.

## विविध कार्यशाळेत सहभागी विदयार्थी संख्या

| **अ.क्र** | **उपक्रम** | **विदयार्थी संख्या** | **ठिकाण** |
|---|---|---|---|
| 01 | युवारंग | 10 | पूज्य साने गुरुजी महाविद्यालय शहादा |
| 02 | युवती सभा-3 | 35 | म्हसदी,निजामपुर,कुसुबा,साक्री |
| 03 | नाट्य कौशल्य कार्यशाळा | 04 | शिरपुर |
| 04 | साहस कार्यशाळा | 06 | कला,शास्त्र व वाणिज्य महा.चोपडा |
| | एकुण | 55 | |

## आयोजित कार्यशाळा

| **अ.क्र** | **उपक्रम** | **विदयार्थी संख्या** | **कालावधी** |
|---|---|---|---|
| 01 | युवती व्यक्तीमत्व् विकास कार्यशाळा | 86 | 12/03/2022 |
| 03 | **श्रमसंस्कार व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा** | 146 | 03/03/2022 to 05/03/2022 |
| | एकुण | 232 | |

विदयार्थी विकास विभागाच्या अशा विविध उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी विविध महाविदयालयात तज्ञ प्राध्यापकाबरोबरच संस्थेचे अध्यक्ष मा.दादासो.डॉ.संजयकुमार आर.देवरे

,सचिव मा.ताईसो.डॉ.संजिवनी संजय देवरे,संचालक मंडळ,धनदाई तरुण ऐक्यमंडळ ,संयोजन समिती सदस्य,प्राचार्य डॉ. शिवाजीपाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ,आजी-माजी विदयार्थी इ.अनमोल मार्गदर्शन सहकार्य मोठया प्रमाणाल लाभले. त्यामुळे विदयापीठाने दाखविलेला विश्वास महाविदयालयाने यशस्वी केला .

**डॉ.शिंदे विशाल नारायण** **प्राचार्य**

**विद्यार्थी विकास अधिकारी**